College Code 184
Regd. No.OSM.36/78,Dt. 30/09/1978, F-312L
Hindustani Education Society;s
SHARADCHANDRA MAHAVIDYALAYA, SHIRADHON
Tq.Kallamm Dist.: Osmanabad
(02383)220276, 220093 Fax- 220093
हिन्दुस्थानी एज्युकेशनसोसायटी औसा संचलित,
शरदचंद्र महाविद्यालय,शिराढोण
(Minority Status) ता. कळंब जि. उस्मानाबाद
NAAC Accredited 'B'Grade
Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

---

हिंदुस्तानी एज्युकेशन सोसायटी औसा द्वारा" संचालित

# शरदचंद्र महाविद्यालय शिराढोण

ता. कळंब जिल्हा उस्मानाबाद

**शैक्षणिक वर्ष-2021-22**

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व मराठी भाषा गौरव दिन समारंभ अहवाल

### -: अतिथी व्याख्यान :-

महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त शुक्रवार दिनांक 22 जानेवारी 2022 रोजी सकाळी 11.10 वा. **"मराठी भाषा विकासाचे विविध टप्पे"** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून के.एन. ज्युनियर कॉलेजचे प्रा. सुरेश चंदनशिवे हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.डी.बिराजदार हे होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे प्रा. चंदनशिवे सुरेश आपल्या भाषणात म्हणाले की, मराठी भाषा समृद्ध करावयाची असेल तर वाचन संस्कृती वाढली पाहिजे. मराठीतून विचार विनिमय आदान-प्रदान होणे गरजेचे आहे. मराठी भाषा विकासाचे विविध टप्पे निर्माण झाले असले तरी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याशिवाय तिचा सर्वांगीण विकास होणार नाही असे प्रतिपादन त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. मराठी भाषेला जागतिक दर्जाचे बनवणे यासाठी संशोधकांनी नवीन नवीन पारिभाषिक रचना व संदर्भ ग्रंथ निर्मिती करणे गरजेचे आहे.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.डी.बिराजदार म्हणाले की, मराठी भाषेला समृद्ध अशी परंपरा आहे पण या परंपरेने मधून बाहेर पडून नवीन भाषिक तंत्रज्ञान विकसित करणे गरजेचा आहे तरच मराठी भाषा जागतिक दर्जाची भाषा म्हणून ओळखली जाईल.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Principal
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon, Tq. Kallam

Website : www.hesausa.org E-mail- pri.smsshiradhon@gmail.com

Scanned with CamScanner

Regd. No.OSM.36/78,Dt. 30/09/1978, F-312L
Hindustani Education Society;s
SHARADCHANDRA MAHAVIDYALAYA, SHIRADHON
Tq.Kallamm Dist.: Osmanabad
(02383)220276, 220093 Fax- 220093
हिन्दुस्थानी एज्युकेशनसोसायटी औसा संचलित,
शरदचंद्र महाविद्यालय,शिराढोण
(Minority Status) ता. कळंब जि. उस्मानाबाद
NAAC Accredited 'B'Grade
Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

# मराठी भाषा गौरव दिन समारंभ

महाविद्यालयात दिनांक 27 फेब्रुवारी 2022 वार रविवार रोजी सकाळी 11 वाजता मराठी भाषा गौरव दिनानिमित्त **"मराठीतील कवींची परंपरा"** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून के एन ज्युनियर कॉलेज शिराढोण येथील सुप्रसिद्ध कवी व व्याख्याते प्रा. डॉ. सय्यद अकबर लाला हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे डी बिराजदार हे होते याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे डॉ. अकबर लाला आपल्या भाषणात म्हणाले की, मराठी कवींची मोठी परंपरा आहे या कवींनी मराठी माणसाला समृद्ध केले आहे. भाषा आणि समाज एकत्र आल्याशिवाय सामाजिक उन्नती शक्य नाही. कवि मानवी मूल्यांना आपल्या शब्दात बंदिस्त करत असतो. या शब्दातून तो कष्टकरी शोषित वंचित समाजाचा आवाज बनण्याचा प्रयत्न करत असतो. यातूनच कवी आपल्या कवितेला घडवत असतो. आपल्या सदाबहार कवितेने त्यांनी श्रोते व रसिकांना मेजवानी दिली होती.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे डी बिराजदार यांनी आपल्या मनातील भाव भावना व्यक्त करण्याचे काम कवी करत असतो. कविता मानवी मनाला आल्हाददायक वातावरण निर्मिती करून देत असते म्हणून कवी वाढला पाहिजे जपला गेला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Principal
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon Ta. Kallam



Scanned with CamScanner









Scanned with CamScanner